## सर्वोच्च न्यायालयाचा 'यूजीसी'ला मोठा झटका




वर्ष - 9 । अंक - 156 UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज (TM)

WWW.MAHAENEWS.COM | शनिवार, दि. 31 जानेवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



पान 2 वरुन...

अजितदादांच्या शब्दपूर्तीसाठी शरद पवार पुन्हा सक्रिय

## राज्याची धुरा सांभाळणार : आज होणार शपथविधी

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार!

**महाईन्यूज । मुंबई**

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी रोजी सकाळी विमान अपघातात निधन झाले. पवार कुटुंबासह संबंध महाराष्ट्रासाठी हा मोठा धक्का होता. बारामती आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासाठी ही मोठी हानी असल्याचे मानले जाते. पक्ष आणि पवार कुटुंबात आलेल्या रितेपणातून वाट काढण्याचा प्रयत्न केला जात आहे. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे.**



महाराष्ट्राला पहिल्या महिला उपमुख्यमंत्री मिळणार आहेत. उद्या सकाळी 11 वाजता राष्ट्रवादीच्या सर्व आमदारांची मुंबईत महत्त्वाची बैठक होणार आहे, त्यानंतर सायंकाळी सुनेत्रा पवार या उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहेत. अजित पवार यांचे राजकीय सल्लागार नरेश अरोरा यांनी या संदर्भात सुनेत्रा पवार यांच्यासोबत चर्चा केली आहे, सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदासाठी होकार दिला आहे.

त्य ।



आता उद्या सायंकाळी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहेत.

दरम्यान उद्या सुनेत्रा पवार या उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहेत. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीवादीच्या गोटात घडामोडींना वेग आला आहे, राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व वरिष्ठ नेते छगन भुजबळ, सुनील तटकरे, धनंजय मुंडे, प्रफुल्ल पटेल हे सर्व मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांची भेट घेण्यासाठी वर्षा निवासस्थानी दाखल झाले होते, वर्षा निवासस्थानी बैठक झाली, आणि या बैठकीनंतर अखेर सुनेत्रा पवार यांच्या नावावर उपमुख्यमंत्रिपदासाठी शिक्कामोर्तब करण्यात आलं आहे.

## २०२४ ची लोकसभा आणि कौटुंबिक वाद

२०२३ साली अजित पवार यांनी वेगळा निर्णय घेत महायुती सरकारला पाठिंबा दिला आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या मंत्रिमंडळात ते उपमुख्यमंत्री झाले. या निर्णयामुळे राष्ट्रवादीत दोन गट पडले आणि अजित पवारांचा गट अधिकृत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असल्याचा निर्णय केंद्रीय निवडणूक आयोग आणि विधानसभा अध्यक्षांनी दिला. २०२४ साली झालेल्या लोकसभा निवडणुकीत अजित पवार यांनी सुनेत्रा पवार यांना सुप्रिया सुळेंच्या विरोधात उमेदवारी दिली. पवार कुटुंबासाठी हा मोठा कसोटीचा काळ होता. या निवडणुकीत पवार कुटुंब सरळ सरळ दोन गटात विभागलेले दिसले. अजित पवारांचे सख्खे बंधू आणि त्यांच्या अडचणीच्या काळात नेहमी साथ देणारे श्रीनिवास पवारही शरद पवार यांच्या बाजूने होते. मात्र सुनेत्रा पवार यांनी अजित पवारांना खंबीर साथ देत नेटाने लोकसभेचा प्रचार केला. मात्र त्यांचा विजय होऊ शकला नाही. सुप्रिया सुळे यांना ७.३२ लाख मते मिळाली होती. तर सुनेत्रा पवार यांना ५.७३ हजार मते मिळाली होती. सुप्रिया सुळे यांनी १.५९ लाख मतांनी विजय मिळवला होता.

## कोण आहेत सुनेत्रा अजित पवार?

सुनेत्रा पवार यांचा जन्म (१८ ऑक्टोबर १९६३) धाराशिव जिल्ह्यातला. धाराशिवचे नेते आणि शरद पवारांचे जुने स्नेही पद्मसिंह पाटील यांच्या त्या भगिनी आहेत. सुनेत्रा पवार यांना लहानपणापासूनच राजकारण आणि समाजकारणाचा वारसा मिळाला होता. १९८० मध्ये त्यांचे अजित पवार यांच्याशी लग्न झाले. अजित पवार राजकारणात सक्रिय झाल्यानंतरही सुनेत्रा पवार राजकारणापासून दूर होत्या. बारामतीमध्ये शेती आणि समाजकारणात त्यांचा सहभाग मात्र होता. पर्यावरण आणि स्वच्छतेची आवड असणाऱ्या सुनेत्रा पवारांनी बारामतीमध्ये एन्व्हायर्नमेंटल फोरम ऑफ इंडिया ही सामाजिक संस्था स्थापन केली होती. या संस्थेच्या माध्यमातून त्या पर्यावरणाशी निगडित काम करत आल्या आहेत. तसेच बारामतीमधील महिलांना रोजगार मिळावा यासाठी त्यांनी टेक्सटाईल पार्कची सुरुवात केली. याज या पार्कमध्ये हजारो महिला काम करत आहेत. २००६ पासून टेक्सटाईल पार्कचे अध्यक्षपद सुनेत्रा पवार यांच्याकडे आहे. तसेच त्या विद्या प्रतिष्ठान या संस्थेवरही विश्वस्त म्हणून काम करत आहेत.

## राज्यसभेच्या खासदार

लोकसभेत पराभव झाल्यानंतर सुनेत्रा पवार यांची वर्णी राज्यसभेवर लावण्यात आली. प्रफुल पटेल यांच्या रिक्त झालेल्या जागेसाठी राज्यसभेची निवडणूक झाली. या जागेवर १३ जून २०२४ रोजी सुनेत्रा पवार यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्यानंतर त्या राज्यसभेच्या सदस्य झाल्या.

# अजितदादांच्या शब्दपूर्तीसाठी शरद पवार पुन्हा सक्रिय

## वैयक्तिक दुःखावर मात करत निर्णायक भूमिकेत

महाईन्यूज | पुणे

**राज्याच्या राजकारणात कायम सक्रिय आणि निर्णायक भूमिका बजावणारे नेते म्हणून ओळखले जाणारे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर राजकीय वर्तुळात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. मात्र या दुःखद घटनेनंतरही राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार पुन्हा एकदा सक्रिय झाल्याचे पाहायला मिळत आहे.**



आपल्या मुलासमान असलेल्या पुतण्याच्या निधनाचे गहिरे दुःख उराशी बाळगत शरद पवार यांनी आज अजित पवार यांचा सावडण्याचा विधी पार पाडला. हा विधी अत्यंत भावनिक वातावरणात पार पडला. मात्र या दुःखातून त्यांनी स्वतःला सावरले. त्यांनी थेट जनतेच्या प्रश्नांकडे लक्ष देत नीरा नदीच्या प्रदूषणाची प्रत्यक्ष पाहणी केली.नीरा नदीच्या प्रदूषणाबाबत अजित पवार यांनी हयात असताना गांभीर्याने लक्ष घातले होते. खाजगी कारखान्यांतून सोडण्यात येणाऱ्या रासायनिक पाण्यामुळे नीरा नदीचे पाणी मोठ्या प्रमाणावर प्रदूषित झाले होते. काही दिवसांपूर्वी या प्रदूषणामुळे नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर मासे मृत्युमुखी पडल्याची घटना घडली होती.या घटनेमुळे नदीकाठच्या नागरिकांमध्ये आणि शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली होती. शेतकऱ्यांनी हा गंभीर प्रकार थेट उपमुख्यमंत्री अजित पवार आणि शरद पवार यांच्या कानावर घातला होता. यावेळी अजित पवार यांनी शेतकऱ्यांना नीरा नदी प्रदूषणमुक्त करण्याचे ठाम आश्वासन दिले होते.

अजित पवार यांच्या निधनानंतर "आता या प्रश्नाकडे कोण लक्ष देणार?" असा प्रश्न उपस्थित होत असतानाच, शरद पवार यांनी आज स्वतः नीरा नदीच्या प्रदूषणाची पाहणी करत अजित पवारांचा शब्द पूर्ण करण्याचा निर्धार दाखवला आहे. पाहणीदरम्यान शरद पवार यांनी नीरा नदीकाठच्या नागरिकांशी आणि शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला. शेतकऱ्यांच्या समस्या, प्रदूषणामुळे शेतीवर होणारे परिणाम, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न याबाबत त्यांनी सविस्तर माहिती घेतली.


या पाहणीदरम्यान शरद पवार यांनी संबंधित यंत्रणांना प्रदूषणास कारणीभूत ठरणाऱ्या खाजगी कारखान्यांची चौकशी करून कडक कारवाईचे संकेत दिल्याची चर्चा आहे. नीरा नदीचे पाणी शुद्ध करण्यासाठी ठोस उपाययोजना राबवण्यात येतील, असा विश्वासही त्यांनी नागरिकांना दिला.

---

# जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणुकीसाठी 23,743 अधिकारी-कर्मचारी तैनात

महाईन्यूज | पुणे

**जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या मतदानासाठी जिल्हा प्रशासनाने 23 हजार 743 अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे. प्रत्यक्षात 18 हजार 179 अधिकारी व कर्मचाऱ्यांची गरज असून, राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार 30 टक्के अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले आहे.**



निवडणुकीच्या तारखेत बदल करण्यात आला असून, आता ही निवडणूक 7 फेब्रुवारीला होणार आहे. जिल्ह्यात एकूण 3 हजार 605 मतदान केंद्र स्थापन केली आहेत. इंदापूर तालुक्यात सर्वाधिक 400 मतदान केंद्र असून, तेथे 2632 अधिकारी व कर्मचारी तैनात राहतील, तर वेल्हा तालुक्यात 105 मतदान केंद्र असून, तेथे 450 अधिकारी व कर्मचारी तैनात करण्यात येणार आहेत. जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी जिल्ह्यातील मतदान केंद्रांची संख्या मतदारांच्या संख्येनुसार निश्चित करण्यात आली आहे. या सर्व मतदान केंद्रांसाठी 18 हजार 179 मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. तसेच आपत्कालीन परिस्थितीसाठी 30 टक्के अतिरिक्त अधिकारी व कर्मचारी म्हणून 5 हजार 564 जणांची नेमणूक केली आहे. त्यामुळे जिल्ह्यात एकूण 23743 अधिकारी व कर्मचारी प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेत सहभागी होणार आहेत.

या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना मतदान केंद्रावरील कामासाठी नियुक्तीचे आदेश जिल्हा प्रशासनाने जारी केले आहेत.बाराशेहून अधिक मतदार असलेल्या मतदान केंद्रांसाठी अतिरिक्त मतदान केंद्राध्यक्ष अर्थात प्रिसायडिंग ऑफिसरची नियुक्ती करण्यात येणार आहे. या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे तीन टप्प्यांत प्रशिक्षण घेण्यात येणार असून, पहिली दोन प्रशिक्षणे प्रत्येकी दोन दिवसांची असतील, तर तिसरे व अंतिम प्रशिक्षण प्रत्यक्ष मतदानाच्या आदल्या दिवशी जाईल.

### 13 पैकी 8 तालुक्यांत सूक्ष्म निरीक्षक नियुक्त

प्रत्येक मतदान केंद्रावर मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी क्रमांक 1, 2 व 3 तसेच एक शिपाई यांची नेमणूक करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे 13 तालुक्यांपैकी 8 तालुक्यांमध्ये आधीच सूक्ष्म निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. मात्र बारामती, मावळ, शिरूर, हवेली व पुरंदर या तालुक्यांमध्ये सूक्ष्म निरीक्षकांची नेमणूक करण्यात आलेली नाही. ती नेमणूक लवकरच होईल असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

# भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे ठरले 'गेम चेंजर'

## महापालिका निवडणुकीत प्रभाग 28 मध्ये राष्ट्रवादीला रोखले

महाईन्यूज | पिंपरी

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपाचे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी राजकीय दृष्ट्या महत्त्वाची आणि आव्हानात्मक अशी दुहेरी भूमिका यशस्वीरीत्या पार पाडली आहे. स्वतःचा बालेकिल्ला असलेल्या प्रभागातून भाजपाच्या तिकीटावर स्वत:सह आणखी दोन उमेदवार बहुमताने निवडून आणले आहेत.**



प्रभाग क्रमांक 28 अर्थात पिंपळे सौदागर- रहाटणी भागातून अत्यंत चुरशीच्या झालेल्या या निवडणुकीत भाजपाच्या तीन जागा जिंकल्याचे श्रेय शत्रुघ्न काटे यांना जाते.तसेच,शहराच्या 32 प्रभागांमध्ये शहराध्यक्षपदाची जबाबदारीसुद्धा त्यांनी समर्थपणे सांभाळली आहे.वस्तविक, पूर्वी शहरात दोन सदस्य प्रभाग पद्धती होती.

सुमारे 25 वर्षे सत्तेत असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा शहरात मोठा पगडा होता. त्यातच पिंपळे सौदागरमध्ये राष्ट्रवादीचे नेते विठ्ठल उर्फ नाना काटे यांचे 'होम पीच' म्हणून वर्चस्व कायम होते. या प्रभागातून 2017 च्या निवडणुकीत नाना काटे आणि त्यांच्या सौभाग्यवती शीतल काटे दोघेजण निवडून आले होते. राष्ट्रवादीचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नाना काटे यांना विरोधी पक्षनेतेपद दिले होते. त्यानंतर विधानसभा निवडणुकीचा उमेदवार म्हणून काटे चिंचवड विधानसभा क्षेत्रात प्रभावीपणे काम करीत होते. त्यामुळे प्रभाग क्रमांक 28 ची निवडणूक अत्यंत लक्षवेधी होणार, हे निश्चित होते.दरम्यान, महानगरपालिका निवडणुकीची घोषणा झाली.

राष्ट्रवादीचे नेते नाना काटे यांच्यावर पक्षाने निवडणूक प्रचार प्रमुख पदाची जबाबदारी सोपवली होती. त्यामुळे याच प्रभागातून भाजपाचे नगरसेवक म्हणून प्रतिनिधीत्व करणारे आणि विद्यमान शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्यात 'काँटे की टक्कर' होणार यावर शिक्कामोर्तब झाले होते.वास्तविक, भारतीय जनता पार्टीच्या सत्ताकाळात शत्रुघ्न काटे यांना कोणतेही महत्त्वाचे पद मिळाले नाही. यावेळी ते निवडून आल्यास महत्त्वाचे पदावर दावा करतील किंवा विधानसभा निवडणुकीत स्पर्धक म्हणून समोर येतील, या अस्वस्थतेतून पक्षांतर्गत आणि पक्षाबाहेरील प्रतिस्पर्धींनी शत्रुघ्न काटे यांना कायम छुपा विरोध केला आहे. त्याच अस्वस्थतेतून "प्रभाग 28 मध्ये नाना काटे यांच्यासोबत "सेटिंग करणार आहेत.." असा 'फेक नॅरेटिव्ह' पसरवण्यात आला.

पक्षश्रेष्ठींपर्यंत सोयीस्कर 'मॅसेज' पोहोचवण्यात आला. त्याची परिणीती प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या आकुर्डीतील सभेत पहायला मिळाली. राजकीय उद्देशाने राबवलेले षडयंत्र शत्रुघ्न काटे यांनी कृतीतून उधळून लावले. प्रभागातील 4 पैकी 3 जागा बहुमताने जिंकल्या आणि शहरातील भाजपाच्या विजयाचा कळस रचला आहे. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निकालानंतर त्यांना फोन करुन अभिनंदन केले.

### शत्रुघ्न काटे यांचे निर्णायक नेतृत्व

शहराध्यक्ष या नात्याने संपूर्ण पिंपरी-चिंचवडमध्ये उमेदवारांची निवड, प्रचाराची दिशा, कार्यकर्त्यांचे समन्वय आणि बूथस्तरीय नियोजन यावर काटे यांनी लक्ष केंद्रीत केले. त्याच वेळी, स्वतःच्या प्रभागातील निवडणूकही तेवढ्याच ताकदीने लढवत 'गड जिंकणे आणि शहर सांभाळणे' ही दुहेरी जबाबदारी यशस्वी केली. शत्रुघ्न काटे यांनी प्रभागात प्रचंड वातावरण निर्माण केले. त्यामुळे नाना काटे यांना प्रभागात लक्ष केंद्रीत करावे लागले. त्याचा फायदा चिंचवड मतदार संघासह पिंपरी आणि भोसरीतसुद्धा भाजपाला झाला आहे. या निकालामुळे भाजपात नवचैतन्य निर्माण झाले असून, शत्रुघ्न काटे हे केवळ संघटनात्मक नेते नव्हे तर निवडणूक रणनितीमध्येही प्रभावी असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. आगामी राजकीय वाटचालीसाठी हा विजय भाजपासाठीच नव्हे, तर शत्रुघ्न काटे यांच्यासाठीही निर्णायक ठरणारा मानला जात आहे.

### अशी झाली प्रभाग 28 मध्ये लढत!

राष्ट्रवादीचे नेते नाना काटे आणि त्यांच्या सौभाग्यवती शीतल काटे दोघेही निवडणुकीच्या रिंगणात होते. भाजपाकडून शत्रुघ्न काटे, अनिता काटे, कुंदा भिसे आणि संदेश काटे यांनी निवडणूक लढवली. राष्ट्रवादीकडून नाना काटे, शीतल काटे, उमेश काटे आणि मिनाक्षी काटे असे उमेदवार होते. भाजपाचे पॅनेलप्रमुख म्हणून शत्रुघ्न काटे यांनी 17 हजार 589 मते मिळवत विजय मिळवला आहे. तर राष्ट्रवादीचे पॅनेलप्रमुख म्हणून 17 हजार 261 मते मिळाली आहेत. या निवडणुकीत नाना काटे यांच्या सौभाग्यवती शीतल काटे यांचा पराभव झाला आहे. नाना काटे यांची वैयक्तिक ताकद आणि स्थानिक प्रभाव असूनही भाजपाने या प्रभागात ४ पैकी ३ जागांवर विजय मिळवत आपला दबदबा कायम राखला. हा विजय केवळ स्थानिक राजकारणापुरता मर्यादित नसून, शत्रुघ्न काटे यांच्या नेतृत्वक्षमतेवर शिक्कामोर्तब करणारा ठरला आहे.

# दादा मला माफ करा.. आमदार महेश लांडगे भावनिक

महाईन्यूज | पिंपरी

**पिंपरी-चिंचवड शहरात स्व. अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. या शोकसभेला विविध पक्षांचे नेते, पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.**






स्व. अजित पवार यांच्या निधनानंतर आयोजित शोकसभेत राजकीय मतभेद बाजूला ठेवत मानवी भावनांचा हृदयस्पर्शी आविष्कार पाहायला मिळाला. भारतीय जनता पक्षाचे भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश लांडगे यांनी या शोकसभेत उपस्थित राहून स्व. अजित पवार यांच्या प्रतिमेसमोर हात जोडून श्रद्धांजली अर्पण केली. त्यांच्या उपस्थितीनेच सभेचे वातावरण गंभीर झाले होते; मात्र त्यानंतर त्यांनी केलेल्या अत्यंत संक्षिप्त आणि भावनिक वक्तव्याने संपूर्ण सभागृह स्तब्ध झाले. अवघ्या चाळीस सेकंदांच्या भाषणात महेश लांडगे यांनी कोणतेही राजकीय भाष्य न करता, केवळ "दादा, मला माफ करा," असे भावनांनी भरलेले शब्द उच्चारले. हे शब्द बोलताच त्यांनी कोणतीही पुढील प्रतिक्रिया न देता मंचावरून खाली उतरणे पसंत केले. त्यांच्या या अनपेक्षित आणि मन हेलावून टाकणाऱ्या वक्तव्यामुळे सभास्थळी क्षणभर शांतता पसरली. अनेक उपस्थितांचे डोळे पाणावले, तर काहींनी हा क्षण राजकारणाच्या पलीकडे जाणारा असल्याची भावना व्यक्त केली. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर स्व. अजित पवार आणि महेश लांडगे यांच्यात तीव्र राजकीय संघर्ष पाहायला मिळाला होता. त्या काळात दोन्ही बाजूंनी झालेली कठोर टीका, आरोप-प्रत्यारोप आणि वैयक्तिक स्वरूपाचे उल्लेख यामुळे राजकीय वातावरण तापले होते. विशेषतः त्या काळात करण्यात आलेल्या काही वक्तव्यांनी स्व. अजित पवार यांना मानसिक वेदना झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली होती. या संघर्षाची आठवण अनेकांच्या मनात अजूनही ताजी असताना, आजच्या शोकसभेत मात्र सर्व राजकीय मतभेद पूर्णतः बाजूला ठेवण्यात आले.

या शोकसभेत महेश लांडगे यांनी व्यक्त केलेली भावना केवळ राजकीय औपचारिकता नव्हे, तर अंतःकरणातून आलेली खंत आणि पश्चात्ताप असल्याचे उपस्थितांचे म्हणणे होते. त्यांच्या "दादा, मला माफ करा" या एका वाक्यातील भावार्थाने संपूर्ण कार्यक्रमाचे स्वरूप बदलले. राजकीय विरोधक असले तरी मानवी नात्यांची आणि संवेदनशीलतेची जाणीव या प्रसंगातून प्रकर्षाने समोर आली. या भावनिक क्षणामुळे शोकसभेला एक वेगळेच महत्त्व प्राप्त झाले असून, हा प्रसंग पिंपरी-चिंचवडच्या राजकीय इतिहासातील एक लक्षवेधी क्षण म्हणून नोंदला जाईल, अशी प्रतिक्रिया अनेक राजकीय विश्लेषक आणि उपस्थितांनी व्यक्त केली. राजकारण कितीही तीव्र असले तरी अंतिम क्षणी मानवी भावना सर्वांत मोठ्या ठरतात, हे या शोकसभेतून अधोरेखित झाल्याचे चित्र दिसून आले.



# भूमिका

**आत्मकेंद्रित होऊ पाहणाऱ्या जगात भारताची भूमिका काय, या मूलभूत प्रश्नाला थेट भिडण्याचे धाडस यंदाच्या आर्थिक पाहणी अहवालात दिसत नाही. उलट, सकल राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर आधीच्या सरकारी घोषणांपेक्षा कमी राहील, हे वास्तव स्वीकारतानाही अहवाल 'सगळे काही नियंत्रणात आहे' असेच चित्र रंगवतो.**

# कृश रुपया; लठ्ठ भारतीय!

केंद्रीय अर्थसंकल्प दरवर्षी १ फेब्रुवारी रोजी सादर करण्याचा सरकारचा अलिखित नियम यंदाही पाळला जाणार आहे. यंदा ही तारीख रविवार असली तरी अर्थसंकल्प सादर केला जाणार असून त्यानिमित्त भांडवली बाजारही उघडे राहतील. परंपरेनुसार अर्थसंकल्पाच्या पूर्वसंध्येला आर्थिक पाहणी अहवाल सादर केला जातो. कारण अर्थसंकल्प आगामी वर्षाचे नियोजन मांडतो, तर आर्थिक पाहणी अहवाल सरत्या वर्षाचे वास्तव चित्र दाखवतो. मात्र यंदा हा संकेत मोडण्यात आला. आर्थिक पाहणी अहवाल २९ जानेवारी रोजीच सादर करण्यात आला. हे का घडले, याचा उहापोह न करता अहवालातील आशयाकडे लक्ष देणेच अधिक योग्य ठरते.

एकेकाळी अरविंद सुब्रमणियन यांनी आर्थिक पाहणी अहवालाला केवळ आकडेवारीपुरता न ठेवता वैचारिक चौकट दिली. त्यानंतर आलेल्या अनंत नागेस्वरन यांनीही तोच पायंडा पुढे चालू ठेवत अहवाल तुलनेने वाचनीय आणि विश्लेषणप्रधान ठेवला आहे. यंदाचा अहवालही तसाच कथानकाच्या शैलीत मांडलेला आहे. या अहवालात आगामी काळासाठी जागतिक अर्थव्यवस्थेच्या तीन शक्यता मांडण्यात आल्या आहेत. पहिली- 'नियंत्रित गोंधळ', दुसरी-'बहुकेंद्री जगव्यवस्थेचे विस्कळीत होणे' आणि तिसरी- 'व्यवस्थात्मक धक्क्यांची साखळी'. पहिल्या दोन शक्यतांची शक्यता ४० ते ४५ टक्के तर तिसऱ्याची १० ते २० टक्के असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या तिन्ही शक्यतांमधील समान धागा म्हणजे वाढती अनिश्चितता आणि बाजारातील अस्थिरता. भांडवली बाजारात इतकी अस्थिरता वाढू शकते की सरकारला हस्तक्षेप करावा लागेल, असा इशाराही अहवाल देतो. त्यामुळे गुंतवणूकदारांनी परताव्याबाबत अती आशावादी राहू नये, हा सूचक सल्ला यात दडलेला आहे. मात्र या जागतिक अस्थिरतेचे खापर आत्मकेंद्रित होत चाललेल्या जगावर फोडताना भारत स्वतः त्या प्रवाहाचा भाग कसा बनतो आहे, याचे आत्मपरीक्षण अहवाल टाळतो. अमेरिका व युरोप देशांतर्गत बाजाराला प्राधान्य देत असताना भारतानेही त्याच मार्गाने जाणे कितपत योग्य, हा प्रश्न अनुत्तरित राहतो. आजही जागतिक उत्पादन क्षेत्रात भारताचा वाटा अवघा




१.८ टक्के, तर सेवा क्षेत्रात सुमारे ४.२ टक्के आहे. यावरून भारताला निर्यात-अभिमुख धोरणाची किती गरज आहे, हे स्पष्ट होते. अहवालानुसार सकल राष्ट्रीय उत्पन्न वाढ ६.८ ते ७.२ टक्क्यांच्या दरम्यान राहील. हा अंदाज आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने आधीच वर्तवला होता. विशेष म्हणजे, ज्या संस्थेवर सरकारने पूर्वी टीका केली, त्याच अंदाजाशी आता सरकार सहमत दिसते. शिवाय, चालू आर्थिक वर्षात वाढ ७.४ टक्के असेल, हा पूर्वीचा दावा मागे पडतो. देशांतर्गत मागणी वाढल्याने अर्थव्यवस्था गती घेईल, असा विश्वास अहवाल व्यक्त करतो. मात्र या आशावादाला छेद देणारा मुद्दा म्हणजे भारतीयांमधील वाढता लठ्ठपणा. अहवालानुसार २४ टक्के महिला आणि २३ टक्के पुरुष लठ्ठ आहेत. यामुळे आरोग्य खर्च वाढतो, उत्पादकता घटते आणि अर्थव्यवस्थेवर दीर्घकालीन परिणाम होतो. रुपया डॉलरच्या तुलनेत घसरत असताना, वाढता लठ्ठपणा आणि कृश रुपया हीच खरी आव्हाने असल्याचे हा अहवाल सूचित करतो. आता प्रश्न एवढाच-येणारा अर्थसंकल्प या आव्हानांवर काही ठोस उपाय सुचवतो का, हे पाहावे लागेल.

## प्रासंगिक »

### विद्येची किंमत

***एकदा रामकृष्ण परमहंस गंगास्नानासाठी शिष्यासह गंगेवर गेले. त्यावेळी एक सिद्ध पुरुषही तिथे होते.***

त्यांनी एक चादर पाण्यावर पसरली व त्यावर उभे राहून नदी पार केली, तसेच परत आले व रामकृष्णांच्या एका शिष्याला म्हणाले तुमचे गुरु असा चमत्कार करू शकतील का ? बारा वर्षे तप करून मी ही सिद्धी मिळवली आहे. शिष्याने रामकृष्णांना हे सांगितले ते म्हणाले," त्यांना सांग तुझा हा चमत्कार दोन आणे किमतीचा आहे." शिष्याने हा निरोप सिद्ध पुरुषाला सांगितला. तो भलताच भडकला मनाला," पुन्हा असे म्हणाला तर तुमचे भस्म करून टाकेन."

'रामकृष्णाने पुन्हा तसेच म्हटलं तेव्हा प्रत्यक्ष त्यांनाच सिद्ध पुरुषांनी त्याचा अर्थ विचारला रामकृष्ण म्हणाले, 'नावाडी सुद्धा दोन आण्यात पैलतिराला नेतो. त्याचा इतरांना उपयोग होतो पण तुमची विद्या फक्त तुमच्या पुरतीच आहे. त्या विद्येचा लोकांना उपयोग होत. नाही तिची किंमत शून्य आहे.

**तात्पर्य** - माणसाने आपल्या विद्येचा कर्तृत्वाचा समाजाला उपयोग करून द्यावा.

महाराष्ट्राच्या राजकारणात अजितदादा पवार हे कणखर, थेट आणि निर्णयक्षम नेतृत्व म्हणून ओळखले जात होते. त्यांच्या नेतृत्वामुळे राज्याच्या सत्ताकारणाला स्थैर्य मिळाले होते.

# दादांनंतर पुढे काय ?

भाजप स्वबळावर सत्तेत असतानाही शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन पक्षांना एकत्र ठेवत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकार चालवले, यामागे अजितदादा पवार यांची भूमिका महत्त्वाची ठरली. शरद पवार यांच्याशी राजकीय फारकत घेऊन स्वतंत्र गट स्थापन करणे, निवडणूक लढवून सत्तेत सहभागी होणे आणि उपमुख्यमंत्रीपद भूषवणे—या घडामोडी महाराष्ट्राच्या राजकारणात मोठ्या धाडसाच्या होत्या. मात्र त्यांच्या अनपेक्षित आणि अकाली निधनाने राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)सह संपूर्ण राजकीय वर्तुळ हादरले आहे. हा धक्का इतका मोठा आहे की कार्यकर्ते आणि नेते लगेच सावरतील, असे वाटत नाही.



नेतृत्व घडायला दशके लागतात. किमान पन्नास वर्षांच्या अनुभवातून एक परिपक्व नेता तयार होतो. असे नेते केवळ सत्ता सांभाळत नाहीत, तर अनेकांसाठी मार्गदर्शक आणि आधार बनतात. विकासकामांमध्ये अजितदादा पवार यांचा हात कोणी धरू शकत नव्हता. त्यामुळे त्यांचे जाणे हे राष्ट्रवादीसाठी कधीही न भरून येणारी पोकळी निर्माण करणारे ठरले आहे.

या पार्श्वभूमीवर "दादांनंतर पुढे काय?" हा प्रश्न राष्ट्रवादीतील प्रत्येक आमदार व पदाधिकाऱ्याला सतावत आहे. दादांची पत्नी सुनेत्रा पवार यांच्याकडे नेतृत्व जाईल का, की पुत्र पार्थ किंवा जय यांच्यापैकी कोणी पुढे येईल, हे सध्या स्पष्ट नाही. व्यक्तिगत दुःखातून सावरण्यास त्यांना वेळ लागणार, हे मात्र निश्चित.

अजित पवार गटातील आमदारांसमोर आज 'टू बी ऑर नॉट टू बी' अशी स्थिती आहे. शरद पवार गटाकडे गेले तर सत्तेपासून दूर जावे लागेल, मंत्रिपदे व महामंडळे हातातून जातील आणि विरोधी बाकांवर बसावे लागेल. शिवसेनेच्या 'उबाठा' गटासोबत फारसे काही साध्य होईल, याची खात्री नाही. दुसरीकडे, थेट भाजपमध्ये प्रवेश केल्यास सत्ता, पदे आणि मतदारसंघाच्या विकासाची संधी मिळू शकते; मात्र त्याबरोबर 'अजितदादांशी गद्दारी' केल्याची टीकाही सहन करावी लागेल.

छगन भुजबळ, प्रफुल्ल पटेल यांसारखे अनुभवी नेते गटात असले तरी अजित पवार यांची जागा कोणीही घेऊ शकत नाही, हे वास्तव आहे. भाजपसाठी मात्र ही सुवर्णसंधी ठरू शकते. इतर पक्षांतील आमदार सामील झाल्यास भाजपचे संख्याबळ वाढेल आणि त्याचा फटका शिवसेनेला बसू शकतो. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासाठीही ही कसोटीची वेळ आहे. एका नेत्याच्या निधनानंतर किती राजकीय प्रश्न उभे राहू शकतात, याचे हे जिवंत उदाहरण आहे. अजितदादा पवार यांच्या निधनाने निर्माण झालेल्या या गंभीर पेचप्रसंगातून राष्ट्रवादी कसा मार्ग काढते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कोणता तोडगा काढतात, याकडे आता संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

## ।। अभंगवाणी ।।



वाळो जन मज म्हणोत शिंदळी ।
परि हा वनमाळी न विसंबें ॥१॥

सांडूनि लौकिक जालियें उदास ।
नाहीं भय आस जीवित्वाची ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# समृद्धी महामार्गावर पुन्हा वाहतूक ब्लॉक

## नागपूर, वर्धादरम्यान महामार्ग काही कालावधीसाठी राहणार बंद

महाईन्यूज । मुंबई

**नागपूर ते मुंबई समृद्धी महामार्गावर हायवे ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम अंतर्गत गॅन्ट्री उभारण्याची कामे सध्या महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून (एमएसआरडीसी) सुरु आहेत. या कामासाठी सातत्याने महामार्गावर टप्प्याटप्प्यात वाहतूक ब्लॉक घेतला जातो आहे. त्यानुसार आता ३१ जानेवारी ते ३ फेब्रुवारीदरम्यान १४ टप्प्यांत वर्धा आणि नागपूर दरम्यानच्या भागातील महामार्गावरील वाहतूक काही कालावधीसाठी बंद राहणार आहे.**



**वाहतूक ब्लॉक कुठे आणि कसा..**

१) वर्धा येथील साखळी क्रमांक ५८.९ येथील नागपूर वाहिनीवरील वाहतूक ३१ जानेवारीला दुपारी १२ ते दुपारी १ या वेळेत बंद राहील.

२) वर्धा येथील साखळी क्रमांक ५९.६ येथील नागपूर वाहिनीवरील वाहतूक ३१ जानेवारीला दुपारी १२ ते दुपारी १ या वेळेत बंद राहील.

३) वर्धा येथील साखळी क्रमांक ६५.४ येथील नागपूर वाहिनीवरील वाहतूक ३१ जानेवारीला दुपारी ३ ते दुपारी ४ या वेळेत बंद राहील.

४) सेलू, वर्धा येथील साखळी क्रमांक ३१.५ येथील नागपूर वाहिनीवरील वाहतूक १ फेब्रुवारीला दुपारी ३ ते दुपारी ४ या वेळेत बंद राहील.

५) सेलू, वर्धा येथील साखळी क्रमांक ३७.७ येथील मुंबई वाहिनीवरील वाहतूक १ फेब्रुवारीला दुपारी १२ ते दुपारी १ या वेळेत बंद राहील.

६) सेलू, वर्धा येथील साखळी क्रमांक ३७.७ येथील नागपूर वाहिनीवरील वाहतूक १ फेब्रुवारीला दुपारी ३ ते दुपारी ४ या वेळेत बंद राहील.

७) सेलू, वर्धा येथील साखळी क्रमांक ४५.४ येथील मुंबई वाहिनीवरील वाहतूक १ फेब्रुवारीला दुपारी १२ ते दुपारी१ या वेळेत बंद राहील.

८) हिंगणा, नागपूर येथील साखळी क्रमांक ८.६ येथील मुंबई वाहिनीवरील वाहतूक २ फेब्रुवारीला दुपारी ३ ते दुपारी ४ या वेळेत बंद राहील.

९) हिंगणा, नागपूर येथील साखळी क्रमांक ८.६ येथील नागपूर वाहिनीवरील वाहतूक २ फेब्रुवारीला दुपारी १२ ते दुपारी १ या वेळेत बंद राहील.

१०) हिंगणा, नागपूर येथील साखळी क्रमांक ९.५ येथील मुंबई वाहिनीवरील वाहतूक २ फेब्रुवारीला दुपारी ३ ते दुपारी ४ या वेळेत बंद राहील.

११) हिंगणा, नागपूर येथील साखळी क्रमांक ९.५.६ येथील नागपूर वाहिनीवरील वाहतूक २ फेब्रुवारीला दुपारी १२ ते दुपारी १ या वेळेत बंद राहील.

१२) हिंगणा, नागपूर येथील साखळी क्रमांक ९.० येथील मुंबई वाहिनीवरील वाहतूक २ फेब्रुवारीला दुपारी ३ ते दुपारी ४ या वेळेत बंद राहील.

१३) हिंगणा, नागपूर येथील साखळी क्रमांक ९.० येथील नागपूर वाहिनीवरील वाहतूक २ फेब्रुवारीला दुपारी १२ ते दुपारी १ या वेळेत बंद राहील.

१४) आर्वी, वर्धा येथील साखळी क्रमांक ८४.४ येथील मुंबई वाहिनीवरील वाहतूक ३ फेब्रुवारीला दुपारी ३ ते दुपारी ४ या वेळेत बंद राहिल.

# प्रजासत्ताक दिन संचलनात महाराष्ट्राचा चित्ररथ सर्वोत्कृष्ट

महाईन्यूज । मुंबई

**देशाच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्लीतील कर्तव्यपथावर पार पडलेल्या दिमाखदार सोहळ्यात महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचे सादरीकरण करणारा चित्ररथ सर्वोत्कृष्ट ठरला आहे.**



यंदाच्या प्रजासत्ताक दिन संचलनात महाराष्ट्राने 'गणेशोत्सव: आत्मनिर्भरतेचे प्रतीक' या संकल्पनेवर आधारित चित्ररथ सादर केला होता. या चित्ररथाच्या माध्यमातून महाराष्ट्राची समृद्ध लोकसंस्कृती, गणेशोत्सवाचा सामाजिक वारसा आणि त्यातून मिळणारा आर्थिक रोजगार व आत्मनिर्भरतेचा संदेश अत्यंत प्रभावीपणे मांडण्यात आला होता. चित्ररथावरील भव्य गणेशमूर्ती, पारंपरिक ढोल-ताशा पथक आणि लेझीम खेळणाऱ्या कलाकारांच्या उत्साहाने कर्तव्यपथ दुमदुमून गेला होता. याच प्रभावी सादरीकरणामुळे परीक्षकांनी राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या गटातून महाराष्ट्राच्या चित्ररथाला सर्वोत्तम चित्ररथ म्हणून निवडले आहे.

यंदाच्या संचलनामध्ये राज्यांच्या चित्ररथांमध्ये महाराष्ट्राच्या चित्ररथाने प्रथम क्रमांक पटकावला आहे. केंद्र सरकारकडून या निकालांची अधिकृत घोषणा करण्यात आली असून, या गटात जम्मू-काश्मीर आणि केरळ या राज्यांनी अनुक्रमे द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावला आहे.

केवळ राज्यांच्या श्रेणीतच नव्हे, तर इतर विभागांतही चुरस पाहायला मिळाली. यामध्ये सेना दलातून 'भारतीय नौदल' तर निमलष्करी दलातून 'दिल्ली पोलीस' यांच्या संचलन पथकाला सर्वोत्कृष्ट म्हणून गौरवण्यात आले.

केंद्रीय मंत्रालयांच्या गटामध्ये सांस्कृतिक मंत्रालयाच्या चित्ररथाने बाजी मारली, तर केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग आणि 'वंदे मातरम्' नृत्य समूहाला विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# सर्वोच्च न्यायालयाचा 'यूजीसी'ला मोठा झटका

## नव्या समता नियमावलीच्या अंमलबजावणीला स्थगिती

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**उच्च शिक्षण संस्थांमधील जातीय भेदभाव रोखण्यासाठी लागू करण्यात आलेल्या केंद्रीय विद्यापीठ आयोगाच्या (यूजीसी) 'समता नियमां'ना सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी स्थगिती दिली. हे नियम प्राथमिकदृष्ट्या अस्पष्ट असून त्यांचा दुरुपयोग होऊ शकतो, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले आहे. या प्रकरणात हस्तक्षेप न केल्यास समाजात गंभीर परिणाम होऊ शकतात आणि सामाजिक विभाजन वाढू शकते, असेही न्यायालयाने तोंडी निरीक्षण नोंदवले.**



> यूजीसीच्या नियमांची भाषा प्राथमिकदृष्ट्या अस्पष्ट आहे. भाषेचा दुरुपयोग होऊ नये यासाठी तज्ज्ञांनी त्यात सुधारणा करणे आवश्यक आहे. या नियमांमुळे समाजात फूट पडू शकते, तसेच त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील.
> – सर्वोच्च न्यायालय.



यूजीसीने स्वीकारलेली जातीय भेदभावाची व्याख्या समावेशक नसून काही घटकांना संस्थात्मक संरक्षणाबाहेर ठेवते, असा युक्तिवाद करणाऱ्या विविध याचिकांवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने हा आदेश दिला. या नियमांच्या विरोधात देशातील विविध ठिकाणी विद्यार्थी संघटनांकडून आंदोलन करण्यात आले असून नियम तात्काळ रद्द करण्याची मागणी करण्यात आली. केंद्र सरकार आणि यूजीसीला नोटीस बजावताना, सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जॉयमल्या बागची यांच्या खंडपीठाने या नियमांचा फेरविचार कायदेतज्ज्ञांच्या समितीकडून केला जावा, अशी सूचना केली.

पुढील सुनावणी १९ मार्च रोजी होणार आहे. तोपर्यंत यूजीसीचे २०२६ चे नियम स्थगित राहतील आणि २०१२ चे नियम लागू राहतील, असे खंडपीठाने स्पष्ट केले. १३ जानेवारी रोजी अधिसूचित करण्यात आलेल्या नव्या नियमांनुसार, सर्व उच्च शिक्षण संस्थांमध्ये समता नियम समित्या स्थापन करणे बंधनकारक करण्यात आले होते. या समित्यांमध्ये ओबीसी, अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी), अपंग व्यक्ती आणि महिलांचे प्रतिनिधित्व असणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले होते.

याचिकांमध्ये असा आक्षेप घेण्यात आला की, जातीय भेदभावाची व्याख्या केवळ एससी, एसटी आणि ओबीसी गटांपुरती मर्यादित ठेवण्यात आली आहे. त्यामुळे आरक्षणाबाहेरील गटांतील व्यक्तींना, त्यांच्या जातीय ओळखीमुळे छळ किंवा पक्षपात सहन करावा लागतो, संस्थात्मक संरक्षण आणि तक्रार निवारणापासून वंचित ठेवण्यात आले आहे.

# "४० दिवसांत हिंदू असल्याचा पुरावा द्या, अन्यथा..."; अविमुक्तेश्वरानंद यांचे योगी आदित्यनाथ यांना खुलं आव्हान

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**प्रयागराज माघ मेळ्यात सुरु झालेला शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद आणि योगी सरकार यांच्यातील वाद आता शिगेला पोहोचला आहे. शंकराचार्यांनी शुक्रवारी वाराणसी येथे पत्रकार परिषद घेत राज्य सरकारवर जोरदार हल्ला चढवला. "मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी हिंदू असल्याचे ४० दिवसांत सिद्ध करावे आणि पुरावा देऊ न शकल्यास तुम्हाला नकली हिंदू, ढोंगी आणि कपटी मानले जाईल", असे आव्हानच शंकराचार्यांनी दिले.**



### शंकराचार्यांचे योगींना आव्हान

"गोहत्या बंदीची मागणी करणाऱ्यांना मुख्यमंत्री आणि रामभद्राचार्य यांच्याकडून वेगवेगळ्या पद्धतीने त्रास दिला जात आहे. तुम्ही खरच हिंदू आहात तर गोमातेला राज्य माता म्हणून घोषित करा. राज्यातून होणाऱ्या गोमांस निर्यातीवर बंदी घाला, नाहीतर तुम्हाला गैर हिंदू घोषित करु", असे शंकराचार्य म्हणाले. "सर्व संत, महंतांनी १०-११ मार्च रोजी लखनऊमध्ये एकत्र यावे. तिथे कोण हिंदू आहे, कोण हिंदू हृदयसम्राट आहे आणि कोणाला नकली हिंदू घोषित करावे हे ठरवले जाईल. आता नकली हिंदूंचा पर्दाफाश होणार आहे. जेवढे हिंदू आहेत, त्यांच्यासोबत खूप मोठा छळ केला जात आहे. स्वतःला सादू, योगी, संत आणि भगवाधारी म्हणून घेणारे लोक आणि त्यांचा पक्ष करत आहेत", असा हल्लाबोल शंकराचार्य यांनी केला.

"मला शंकराचार्य म्हणून दर्जा सिद्ध करणारे प्रमाणपत्र मागण्यात आले होते. मी ते दिले. माझे पुरावे खरे होते, म्हणून त्यांना ते स्वीकारावे लागले. पुरावे मागण्याची वेळ संपली आहे. मुख्यमंत्र्यांनी आता ते हिंदू असल्याचा पुरावा द्यावा," असे आव्हान शंकराचार्यांनी दिले. "यासाठी तुम्हाला ४० दिवसांचा कालावधी देत आहे. तुम्ही गोभक्त आहात याचा पुरावा द्या. तुम्हाला पुरावा देता आला नाही, तर तुम्हाला नकली हिंदू, ढोंगी, कपटी मानले जाईल. तुम्ही फक्त दिखाव्यासाठी भगवे वस्त्र परिधान केलेत", असा जोरदार हल्ला शंकराचार्यांनी चढवला.


**इतिहासात पहिल्यांदाच शंकराचार्यांकडे पुरावा मागितला**

"माफी मागण्याची पण एक पद्धत असते. इथचं स्नान करा, आम्ही तुमच्यावर फुले उधळू, असे आमिष प्रशासन आम्हाला दाखवत होते. येत्या वर्षात ते शंकराचार्यांसाठी प्रोटोकॉल तयार करतील, पण आम्ही नकार दिला. ज्या भिक्षूंना तुम्ही काठ्यांनी मारहाण केली अगोदर त्यांची माफी मागा. जर त्यांनी माफ केले तरच ठीक आहे," असे शंकराचार्य म्हणाले.

"इतिहासात पहिल्यांदाच राज्यकर्त्यांनी शंकराचार्यांकडे पुरावा मागितला आहे. जगात विक्री होणारे गोमांस तुमच्या राज्यातून निर्यात होत आहे. याला ४० दिवसांत आळा घालून दाखवा, तेव्हाच आम्ही तुम्हाला हिंदू समजू. आणि ४० दिवसांत शक्य नाही झालं तर आम्ही संत महंत लखनऊला येऊन तुमच्यावर टीका करु", असा इशारा शंकराचार्यांनी यावेळी दिला.


# विराट कोहलीचं सोशल मीडिया अकाउंट अचानक गायब

क्रिकेटपटू विराट कोहलीच्या चाहत्यांची संख्या प्रचंड आहे. त्यामुळेच शुक्रवारी सकाळी विराटचं इंस्टाग्राम अकाउंट अचानक दिसेनासं झाल्यावर अनेक चाहते गोंधळले आणि अस्वस्थ झाले. सोशल मीडियावर विराटची आयडी सापडत नसल्याने चाहत्यांनी थेट त्याची पत्नी व अभिनेत्री अनुष्का शर्माच्या इंस्टाग्राम अकाउंटवर धाव घेतली.विराटच्या अनुपस्थितीमुळे चिंतेत पडलेल्या चाहत्यांनी अनुष्काच्या पोस्टखाली कमेंट्सचा अक्षरशः पाऊस पाडला. काही दिवसांपूर्वी अनुष्काने विराटसोबतचा एक व्हिडिओ शेअर केला होता. त्याच व्हिडिओवर चाहत्यांनी प्रश्न विचारायला सुरुवात केली. एका चाहत्याने लिहिलं, “भाभी, भैयाची आयडी कुठे गेली?” तर दुसऱ्याने कमेंट केली, “किंग भैया, अकाउंट परत ॲक्टिव्ह करा, आता मजाक नको.” आणखी एका चाहत्याने लिहिलं, “भाभी, विराट भैया इंस्टाग्रामवर सापडत नाहीयेत, जरा बोलवा त्यांना.”विराट कोहलीच्या सोशल मीडिया अकाउंटबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. मात्र, चाहत्यांमधील ही उत्सुकता आणि काळजी सोशल मीडियावर स्पष्टपणे दिसून येत आहे.



# जुळ्या मुलींनंतर टीव्ही अभिनेत्री दुसऱ्यांदा होणार आई

टीव्ही अभिनेत्री रुबिना दिलैक तिच्या सौंदर्य, स्पष्टवक्तेपणामुळे सोशल मीडियावर नेहमीच चर्चेत असते. पण यावेळी ती तिच्या एका वेगळ्याच, कारणामुळे चर्चेत आली आहे. अभिनेत्री दुसऱ्यांदा आई होणार आहे.रुबिना दिलैकने २८ जानेवारी २०२६ रोजी तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवरून एक व्हिडिओ शेअर केला आहे आणि या व्हिडिओद्वारे तिने अगदी खास पद्धतीने तिच्या प्रेग्नन्सीची बातमी दिल्याचे दिसत आहे. तिचा हा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. रुबिना दिलैकने शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये ती दीर्घ श्वास घेते आणि नंतर म्हणते, “मी प्रेग्नंट आहे...” हा व्हिडिओ समोर आल्यानंतर चाहते गोंधळात पडले आहेत. रुबिना खरोखरच पुन्हा आई होणार आहे की, हा एखाद्या नवीन प्रोजेक्टचा भाग आहे, असा प्रश्न सगळ्यांना पडला आहे. या व्हिडिओनंतर रुबिना दिलैकने आणखी एक पोस्ट शेअर केली आहे. त्या पोस्टमध्ये तिने लिहिलेय, “जर एखादी गोष्ट तुमच्या मनासारखी झाली नाही, तर ती देवाच्या योजनेनुसार त्याहूनही चांगल्या प्रकारे घडते. हीच खरी सुंदरता आहे.” या पोस्टनंतर सोशल मीडियावर चर्चा सुरू झाली आहे की, रुबिना दुसऱ्यांदा प्रेग्नंट आहे. मात्र, याबाबत अजूनही अभिनेत्रीने कोणतीही अधिकृत माहिती दिलेली नाही. मात्र तिच्या व्हिडिओमुळे ती दुसऱ्यांदा गरोदर असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे. रुबिना दिलैकने प्रसिद्ध टीव्ही अभिनेता अभिनव शुक्लाबरोबर २०१८ साली लग्न केले होते. लग्नानंतर पाच वर्षांनी त्यांनी जुळ्या मुलींना जन्म झाला. ईधा आणि जीवा, अशी त्यांच्या मुलींची नावे आहेत. रुबिना आणि अभिनव ‘बिग बॉस १४’ आणि ‘पति पत्नी और पंगा’ या रिॲलिटी शोमध्ये एकत्र दिसले होते. रुबिना दिलैक आणि अभिनव शुक्ला यांची पहिली भेट एका मित्राच्या घरी गणपती पूजेच्या वेळी झाली होती. त्यानंतर दोघांमध्ये मैत्री झाली आणि ही मैत्री हळूहळू प्रेमात बदलली. दोघांनी जवळपास चार वर्षे एकमेकांना डेट केले आणि २०१८ मध्ये कुटुंबाच्या संमतीने लग्न केले.




# एका शोसाठी दीड कोटी मानधन घेते

हिंदी टेलि-व्हिजनवर काम करणारे अनेक कलाकार मालिकांच्या माध्यमातून लाखो रुपये कमवत असतात, यापैकीच एक नाव म्हणजे जेनिफर विंगेट. जेनिफर हिंदी टेलिव्हिजनवरील लोकप्रिय अभिनेत्री आहे. तिने तिच्या अभिनयाने आणि सौंदर्याने अनेकांची मनं जिंकली आहेत.जेनिफरने ‘बेपन्नाह’, ‘बेहद २’, ‘बेहद’, ‘दिल मिल गये’, ‘शका लका बुम बुम’, ‘कसौटी जिंदगी की’ यांसारख्या लोकप्रिय मालिकांमध्ये काम केलं आहे. जेनिफर हिंदी टेलिव्हिजनवरील सर्वाधिक मानधन घेणाऱ्या अभिनेत्रींपैकी एक आहे. ती खूप ऐषोरामात आयुष्य जगते. जेनिफरची संपत्ती किती आहे आणि ती किती मानधन घेते याबद्दल जाणून घेऊयात...एबीपीच्या वृत्तानुसार जेनिफरने १९९५ मध्ये बालकलाकार म्हणून काम करायला सुरुवात केलेली. ती ‘राजा की आएगी बारात’ या चित्रपटातून झळकलेली. यानंतर तिने ‘शका लका बुम बुम’ या टेलिव्हिजनवरील लोकप्रिय मालिकेत काम केलं आणि तिची एक वेगळी ओळख निर्माण झाली. छोट्या पड्यावर काम केल्यानंतर तिने ओटीटीवरील सीरिजमध्ये काम केले, ज्यामध्ये तिला खूप यश मिळालं. जेनिफर आज तिच्या मेहनतीच्या जोरावर ऐषोरामाचं आयुष्य जगत आहे. तिने टेलिव्हिजनच्या माध्यमातून कोट्यवधींची संपत्ती कमावली आहे. उल्लेख केलेल्या माध्यमाच्या वृत्तानुसार जेनिफर जवळपास ४२ कोटींच्या संपत्तीची मालकीण आहे. तिचं मुंबईत स्वतःचं घर असून तिच्याकडे अनेक महागड्या गाड्या आहेत.जेनिफर एका टीव्ही शोसाठी तब्बल १.५ कोटी इतकं मानधन घेते. छोट्या पडद्यावरील सर्वात श्रीमंत अभिनेत्रींपैकी ती एक आहे. तिच्या खासगी आयुष्याबद्दल बोलायचं झालं तर तिने २०१२ मध्ये करण सिंग ग्रोवरसह लग्न केलेलं. पण, पुढे या दोघांनी विभक्त होण्याचा निर्णय घेतला. नंतर करणने बॉलीवूड अभिनेत्री बिपाशा बासूबरोबर लग्न केलं आणि त्यांना आता देवी नावाची गोंडस मुलगीसुद्धा आहे.



# 57 वर्षांचा अभिनेता 8व्यांदा होणार बाबा!

हॉलिवूडचा लोकप्रिय गायक मार्क ॲंथनीच्या घरी पुन्हा एकदा पाळणा हलणार आहे. वयाच्या ५७ व्या वर्षी तो लवकरच त्याच्या आठव्या बाळाचे स्वागत करणार आहे. त्याची २६ वर्षांची पत्नी नादिया फरेरा गरोदर आहे. दोघांनीही त्यांच्या लग्नाच्या तिसऱ्या वाढदिवशी ही आनंदाची बातमी शेअर केली. मार्क व नादिया यांचे एकत्र हे दुसरे बाळ असेल.मार्क ॲंथनी आणि नादिया फरेरा यांनी इन्स्टाग्रामवर एक फोटो शेअर केला आहे. यामध्ये ती तिचा बेबी बंप फ्लॉंट करताना दिसत आहे. या फोटोत तिचा नवरा आणि मुलाने तिच्या पोटावर हात ठेवला आहे. “लग्नाचा तिसरा वाढदिवस!! MARQUITOआता मोठा भाऊ होणार आहे,” असं तिने कॅप्शनमध्ये लिहिलं. यापूर्वी नादियाने २०२३ मध्ये मुलाला जन्म दिला होता.नादिया व मार्क यांनी ही आनंदाची बातमी सोशल मीडियावर शेअर केल्यावर सेलिब्रिटी त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करत आहेत. मार्क ॲंथनीचं हे आठवं बाळ असून नादियाबरोबरचं त्याचं दुसरं बाळ असेल. मार्क ॲंथनीचे पूर्ण नाव मार्को ॲंटोनियो मुनिझ आहे. १६ सप्टेंबर १९६८ रोजी जन्मलेला मार्क हा अमेरिकन गायक आणि अभिनेता आहे. त्याच्या करिअरमध्ये त्याने ४ ग्रॅमी पुरस्कार, ८ लॅटिन ग्रॅमी पुरस्कार आणि २९ लो न्यूस्ट्रो पुरस्कार जिंकले आहेत. २०१४ पर्यंत, मार्कने जागतिक स्तरावर १२ मिलियनहून जास्त अल्बम विकले होते.नादिया तमारा फरेराचा जन्म १९९९ साली झाला. ती पॅराग्वेची फॅशन मॉडेल आहे. तिने अनेक सौंदर्य स्पर्धा जिंकल्या. ती मिस युनिव्हर्स पॅराग्वे 2021 होती. २०१५ पासून नादिया फॅशन विश्वात सक्रिय आहे. मार्कची सर्वात मोठी मुलगी ३२ वर्षांची आहे. तिचा जन्म १९९४ साली मार्कची गर्लफ्रेंड डेबी रोसाडोपासून झाला होता. नंतर त्याने चेस मुनिझ नावाच्या मुलाला दत्तक घेतलं. मार्कने १९९६ ते १९९८ या काळात अभिनेत्री क्लॉडेट लाली हिला डेट केलं, दोघांनी साखरपुडा केला. मग ते वेगळे झाले.



# भारत-पाक सामन्यात कोण पाहणार जबाबदारी?

## साखळी फेरीतील लढतींसाठी २४ पंचांची नियुक्ती जाहीर!

**महाईन्यूज | नवी दिल्ली**

भारत आणि श्रीलंका यांच्या यजमानपदाखाली रंगणाऱ्या टी-२० वर्ल्ड कप स्पर्धेसाठी अमेरिकेच्या क्रिकेट संघाची घोषणा करण्यात आली आहे. अमेरिकेचा संघ भारताविरुद्ध वानखेडेच्या मैदानातून ७ फेब्रुवारीला आपल्या वर्ल्ड कप मोहिमेची सुरुवात करणार आहे. अमेरिकेचा संघ जाहीर करण्यात आल्यावर कॅप्टनचे गुजरात कनेक्शन आणि वर्ल्ड कप संघात पुन्हा एकदा सॉफ्टवेअर इंजिनिअरची झालेली निवड चर्चेचा विषय ठरत आहे.





### साखळी फेरीतील लढतींसाठी २४ पंचांची नियुक्ती

टी-२० वर्ल्ड कप स्पर्धेतील साखळी फेरीत ७ फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी दरम्यान एकूण ४० सामने खेळवले जाणार आहेत. .। सामन्यांदरम्यान एकूण २४ पंच मैदानावर काम पाहणार आहेत. यामध्ये भारताचे जयरामन मदनगोपाल, नितीन मेनन आणि केएनए पद्मनाभन यांचाही समावेश आहे.  सुपर-८ तसेच सेमीफायनल आणि फायनलसाठी पंचांची घोषणा नंतर करण्यात येईल.

### साखळी फेरीतील सामन्यासाठी या पंचाची करण्यात आली आहे नियुक्ती

रोलँड ब्लॅक, क्रिस ब्राउन, कुमार धर्मसेना, क्रिस गॅफनी, एड्रियन होल्डस्टॉक, रिचर्ड इलिंगवर्थ, रिचर्ड केटलबोरो, वेन नाइट्स, डोनोवन कोच, जयरामन मदनगोपाल, नितीन मेनन, सॅम नोगाजस्की, केएनए पद्मनाभन, अल्लाहुद्दीन पालेकर, अहसान रजा, लेस्ली रीफर, पॉल रीफेल, लँग्टन रुसेरे, शरफुद्दौला इब्ने शाहिद, गाझी सोहेल, रॉड टकर, ॲलेक्स वॉर्फ, रविंद्र विमलसिरी आणि आसिफ याकूब.

### भारत-पाकिस्तान सामन्यात धर्मसेना आणि इलिंगवर्थ

१५ फेब्रुवारी रोजी कोलंबो येथे भारत आणि पाकिस्तान यांच्यातील बहुप्रतिक्षित सामना नियोजितआहे. या सामन्यासाठी इंग्लंडचे रिचर्ड इलिंगवर्थ आणि श्रीलंकेचे कुमार धर्मसेना हे मैदानातील पंचाची जबाबदारी पार पाडताना दिसतील. ५४ वर्षीय कुमार धर्मसेना हे १९९६ च्या विश्वचषक विजेत्या श्रीलंका संघाचे सदस्य होते. त्यांनी आतापर्यंत ९३ कसोटी, १३८ वनडे आणि ४७ टी २० आंतरराष्ट्रीय सामन्यात पंचगिरी केली आहे. ६२ वर्षीय रिचर्ड इलिंगवर्थ यांनी ८२ कसोटी, १०६ वनडे आणि ३५ टी २० सामन्यांत पंच म्हणून काम पाहिले आहे. ते इंग्लंडकडून कसोटी आणि वनडे क्रिकेटही खेळले आहेत.

# टी-२० वर्ल्ड कपसाठी अमेरिकेच्या संघाची घोषणा

**महाईन्यूज | नवी दिल्ली**

भारत आणि श्रीलंका यांच्या यजमानपदाखाली रंगणाऱ्या टी-२० वर्ल्ड कप स्पर्धेसाठी अमेरिकेच्या क्रिकेट संघाची घोषणा करण्यात आली आहे. अमेरिकेचा संघ भारताविरुद्ध वानखेडेच्या मैदानातून ७ फेब्रुवारीला आपल्या वर्ल्ड कप मोहिमेची सुरुवात करणार आहे. अमेरिकेचा संघ जाहीर करण्यात आल्यावर कॅप्टनचे गुजरात कनेक्शन आणि वर्ल्ड कप संघात पुन्हा एकदा सॉफ्टवेअर इंजिनिअरची झालेली निवड चर्चेचा विषय ठरत आहे.



### भारतीय वंशाच्या खेळाडूच्या नेतृत्वाखाली वर्ल्ड कप खेळणार अमेरिका

अमेरिकेच्या संघाने टी-२० विश्वचषक २०२४ स्पर्धेत सुपर ८ फेरीपर्यंत मजल मारली होती. याच जोरावर त्यांना यंदाच्या टी-२० वर्ल्ड कप स्पर्धेत थेट प्रवेश मिळाला आहे. यंदाच्या हंगामातील स्पर्धेसाठी अमेरिकेच्या संघाने भारतीय वंशाच्या गुजरातमध्ये जन्मलेला मोनांक पटेल याच्याकडे नेतृत्व सोपवले आहे. या संघात एकूण १० खेळाडू असे आहेत जे मागील विश्वचषकातही संघाचा भाग होते.

टी-२० विश्वचषक २०२६ स्पर्धेसाठी अमेरिकन संघात पुन्हा एकदा सॉफ्टवेअर इंजिनिअर सौरभ नेत्रवालकर मैदानात उतरल्याचे पाहायला मिळणार आहे. हा खेळाडू मुंबईत जन्मला असून तो IIT बॉम्बेचा पदवीधर आहे. अमिरेकेत स्थायिक झाल्यामुळे तो अमेरिकन क्रिकेट संघाचे प्रतिनिधीत्व करतो. गत टी-२० विश्वचषक स्पर्धेत त्याने गोलंदाजीत खास छापही सोडली होती. आता यावेळी जन्मभूमीत चमक दाखवण्यासाठी तो प्रयत्नशील असेल. याशिवाय अमेरिकेच्या संघात मोहम्मद मोहसिन आणि शेहान जयसूर्या यांना पहिल्यांदाच विश्वचषकासाठी संधी देण्यात आली आहे. अमेरिका आपली विश्वचषकातील मोहीम ७ फेब्रुवारी रोजी मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर भारताविरुद्धच्या सामन्याने सुरू करणार आहे. त्यानंतर १० फेब्रुवारीला कोलंबो येथे पाकिस्तानविरुद्ध त्यांचा दुसरा सामना होणार आहे. पुढे १३ फेब्रुवारीला नेदरलँड्सविरुद्ध तर १५ फेब्रुवारीला नामीबियाविरुद्ध गट टप्प्यातील अखेरचा सामना खेळत अमेरिका आपला प्रारंभिक टप्पा पूर्ण करेल.

टी-२० विश्वचषक २०२६ स्पर्धेसाठी अमेरिकेच्या संघाची अधिकृत घोषणा करण्यात आली असून मोनांक पटेलकडे संघाचे कर्णधारपद सोपवण्यात आले आहे. अनुभवी आणि युवा खेळाडूंचा समतोल साधत निवडण्यात आलेल्या या संघाकडून स्पर्धेत दमदार कामगिरीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.


स्मार्ट PCMC SMART CITY
epaper.mahaenews.com
महाईन्यूज ™
ePaper
। शनिवार ।
दि. 31 जानेवारी 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांची प्रशासनाला सूचना

# अजितदादांच्या स्मरणार्थ पिंपरी-चिंचवडमध्ये "अजित सृष्टी" उभारणार!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**महाराष्ट्राच्या जडणघडणीत मोलाचे योगदान देणारे लोकनेते, दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या स्मरणार्थ पिंपरी-चिंचवड नवीन प्रशासकीय इमारतीच्या आवारात भव्य स्मारक उभारण्यात यावे, अशी आग्रही मागणी भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त श्रावणजी हर्डिकर यांना सविस्तर निवेदन दिले आहे.**



महेश किसनराव लांडगे
आमदार भाजपा, पिंपरी-चिंचवड.

सत्यमेव जयते

जा.क्र. : ४७४८

दिनांक : ३०/०१/२०२६

महापालिकेच्या प्रशासकीय कालानंतर आता निवडणूक झाली. त्यानंतर नवनिर्वाचित नगरसेवकांची पहिली सर्वसाधारण सभा होईल. या पहिल्या सभेतच दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासह स्मारकाचा प्रस्ताव मंजुर करावा आणि अजितदादांना पिंपरी-चिंचवडकरांच्या वतीने श्रद्धांजली वाहावी. तसेच, जुन्या महापालिका सभागृहात आदरणीय अजितदादांचे तैलचित्र बसवण्याची व्यवस्था तातडीने करावी.

तमाम पिंपरी-चिंचवडकरांच्या वतीने अजितदादांच्या स्मरणार्थ नवीन प्रशासकीय इमारतीच्या सभागृहाला अजितदादांचे नाव यावे आणि या इमारतीच्या आवारात पिंपरी-चिंचवड शहराच्या स्थापनेपासूनची विकासाची वाटचाल अधोरेखित करणारे ''पिंपरी-चिंचवड अजित सृष्टी'' उभारावी. त्यामध्ये शहराच्या विकासाचा इतिहास, भविष्यातील नियोजनाची ''फ्युचर प्रिंट'' असावी. अजितदादांचा ब्रॉंझचा पूर्णाकृती पुतळा असावा. हे स्मारक पिंपरी-चिंचवड शहराच्या विकास इतिहासाची साक्ष देणारे तसेच भावी पिढ्यांना लोकसेवेची प्रेरणा देणारे ठरेल आणि अजितदादांना खरी श्रद्धांजली ठरेल, असा आम्हाला विश्वास आहे.

तरी सदर मागणीचा सकारात्मक व सहानुभूतीपूर्वक विचार करून आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी, ही नम्र विनंती आहे.

कळावे,

आपला स्नेहांकित

महेश किसनराव लांडगे

1612

### महाराष्ट्राच्या विकासाची "अजित सृष्टी"

- नवीन प्रशासकीय इमारतीतील सभागृहाला 'अजितदादा पवार सभागृह' असे नाव देण्यात यावे आणि शहराच्या स्थापनेपासून आजपर्यंतचा विकास प्रवास, तसेच भविष्यातील नियोजन अधोरेखित करणारी 'पिंपरी-चिंचवड अजित सृष्टी' उभारण्यात यावी, अशी संकल्पना आहे.
- शहराला विकासामध्ये एक नंबर बनवण्याचे स्वप्न अजितदादांनी पाहिले होते. ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करण्याचा संकल्प आम्ही केला आहे.
- हे स्मारक भावी पिढ्यांना लोकसेवेची प्रेरणा देणारे ठरेल आणि हिच अजितदादांना खरी श्रद्धांजली ठरेल, असा विश्वास आमदार लांडगे यांनी व्यक्त केला आहे.



"महाराष्ट्राच्या विकासाच्या वाटचालीत प्रत्येक टप्प्यावर अजितदादा पवार यांचे दूरदृष्टीचे नेतृत्व लाभले. त्यांच्या कार्याची आणि विचारांची जपणूक होणे ही केवळ भावना नाही, तर आम्हा पिंपरी-चिंचवडकरांची जबाबदारी आहे. नवीन प्रशासकीय इमारतीच्या आवारात उभारण्यात येणारे स्मारक, सभागृहाला दिले जाणारे त्यांचे नाव आणि 'अजित सृष्टी' ही संकल्पना भविष्यातील पिढ्यांना लोकसेवेची प्रेरणा देईल. याबाबत महापालिका प्रशासन सकारात्मक निर्णय घेईल, असा मला पूर्ण विश्वास आहे. त्यासाठी आम्ही सर्वोतोपरी पाठपुरावा करणार आहोत.

- महेश लांडगे, आमदार, पिंपरी-चिंचवड.



चिंचवड येथील डी-मार्टसमोरील 33.86 एकर जागेत उभारण्यात येत असलेल्या नवीन प्रशासकीय संकुलात सुमारे 8.65 एकर क्षेत्रावर मुख्य इमारतीचे काम सुरू असून, भविष्यात महापालिकेचे संपूर्ण प्रशासकीय कामकाज याच ठिकाणाहून चालणार आहे.

या पार्श्वभूमीवर, या इमारतीच्या आवारातच दिवंगत अजितदादांचा पूर्णाकृती ब्रॉंझ पुतळा असलेले स्मारक उभारण्यात येणार आहे.

आमदार लांडगे यांनी नमूद केले आहे की, दिवंगत अजितदादा पवार यांनी उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री म्हणून महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाला गती दिली.


पायाभूत सुविधा, नागरी सेवा, प्रशासकीय निर्णयक्षमता आणि विकासाभिमुख धोरणांमुळे राज्याला वेगळी ओळख मिळाली. असे नेतृत्व अकाली काळाच्या पडद्याआड जाणे ही महाराष्ट्राची मोठी हानी असून, त्यांच्या कार्याची जपणूक होणे ही काळाची गरज आहे.

त्यामुळे नवनिर्वाचित नगरसेवकांच्या पहिल्याच सर्वसाधारण सभेत अजितदादांच्या स्मारकाचा प्रस्ताव मंजूर करून पिंपरी-चिंचवडकरांच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात यावी, यासाठी आम्ही आग्रही आहोत. तत्पूर्वी जुन्या महापालिका सभागृहात अजितदादांचे तैलचित्र तातडीने बसवण्यात यावे, अशी सूचना प्रशासनाला केली आहे.

# न्यू इंग्लिश मीडियम स्कूल, थेरगाव येथे ७७वा प्रजासत्ताक दिन उत्साहात

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**न्यू इंग्लिश मीडियम स्कूल, थेरगाव येथे देशाच्या ७७व्या प्रजासत्ताक दिनाचा सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांनी संचनालय करून प्रजासत्ताक दिनानिमित्त प्रमुख पाहुण्यांचे स्वागत व आमंत्रण दिले.**





> “प्रजासत्ताक दिन हा केवळ उत्सव नसून आपल्या संविधानातील मूल्यांची जाणीव करून देणारा दिवस आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच संस्कार, शिस्त आणि देशप्रेम आत्मसात करून जबाबदार नागरिक घडावे, हीच अपेक्षा आहे. न्यू इंग्लिश मीडियम स्कूलमधील विद्यार्थ्यांनी सादर केलेले उपक्रम प्रेरणादायी आहेत.”
>
> **- विजय पवार, अध्यक्ष, न्यू इंग्लिश मीडियम स्कूल, थेरगाव.**

यावेळी संस्थेचे अध्यक्ष श्री विजय पवार, उपाध्यक्ष निलेश पलगमल, सचिव अशोक मोरे, खजिनदार सुरेखा पवार, तसेच संस्थेचे पदाधिकारी विलास शेलार, विनायक पवार, संध्या पवार, शशिकांत इंगवले, महादेव जमादार उपस्थित होते. यासह थेरगावमधील नवनिर्वाचित नगरसेवक श्री तानाजी भाऊ बारणे व मनिषा ताई पवार हेही मान्यवर म्हणून उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडला. यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक उपक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. काही विद्यार्थ्यांनी प्रभावी भाषणे केली, सामूहिक गीत गायन झाले, तर देशभक्तीपर नृत्यांनी कार्यक्रमात रंग भरला. डंबेल्स, घुंगरू काठी, रिंग, लेझीम अशा विविध कवायत प्रकारांचे सादरीकरण विशेष आकर्षण ठरले. पालकवर्गानेही विद्यार्थ्यांच्या या उपक्रमांना उत्स्फूर्त दाद दिली. चालू शैक्षणिक वर्षात शाळेतील विद्यार्थ्यांनी शालेय खेळ तसेच फेडरेशन स्तरावर किक बॉक्सिंग, युनिफाईट व एल्बो बॉक्सिंग स्पर्धांमध्ये मिळवलेल्या यशाबद्दल विजेत्या खेळाडूंना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना लाडू वाटप करण्यात आले. हा संपूर्ण कार्यक्रम शाळेच्या मुख्याध्यापिका विद्या नाईक मॅडम व अग्निस नायगम मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने यशस्वीरीत्या पार पडला. कार्यक्रमाच्या यशाबद्दल संस्थेच्या सर्व प्राधिकाऱ्यांनी सहभागी सर्वांचे अभिनंदन केले.

# रहाटणी–तापकीर नगरला दिलासा

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**रहाटणी–तापकीर नगर प्रभागात गेल्या सहा महिन्यांपासून नागरिकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत होता.**

अनियमित पाणीपुरवठा, कमी दाबाने येणारे पाणी तसेच काही भागांमध्ये पूर्णतः खंडित झालेल्या पुरवठ्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी होती.

या पार्श्वभूमीवर नगरसेवक बाबासाहेब त्रिभुवन यांनी पाणीपुरवठा विभागाकडे सातत्याने पाठपुरावा करत तातडीची बैठक घेतली. बैठकीस पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता महेश बरीदे, उपअभियंता हृषीकेश गेंगजे, कनिष्ठ अभियंता समीक्षा मालपुरे व संबंधित कर्मचारी उपस्थित होते. बैठकीत प्रभागातील पाणी समस्येचा आढावा घेऊन तात्काळ उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

बैठकीनंतर प्रशासनाने दुरुस्ती कामे, वाल्व तपासणी व पाईपलाईन व्यवस्थापनाची कामे हाती घेतली. त्याचा सकारात्मक परिणाम दिसून येत असून शिवराज नगरसह काही भागांत पाणीपुरवठा सुरळीत झाला आहे. उर्वरित परिसरातील पाणीपुरवठाही लवकरच नियमित होणार असल्याने नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.



# प्रियदर्शनी शाळा, मोशी येथे विद्यार्थ्यांच्या विज्ञान प्रदर्शनातून नवोन्मेषाला चालना



**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**प्रियदर्शनी शाळा, मोशी येथे इयत्ता ६ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी भव्य विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.या प्रदर्शनातून विद्यार्थ्यांना आपल्या वैज्ञानिक कल्पकतेचे व सर्जनशीलतेचे प्रभावी सादरीकरण करण्याची संधी मिळाली.पर्यावरण संरक्षण, अक्षय ऊर्जा, अवकाश विज्ञान, आरोग्य व दैनंदिन जीवनातील तंत्रज्ञान या विषयांवर आधारित विविध मॉडेल्स व प्रयोग विद्यार्थ्यांनी सादर केले.**

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE

प्रत्येक प्रकल्पामध्ये वैज्ञानिक संकल्पनांची सखोल समज आणि त्यांचा प्रत्यक्ष जीवनातील उपयोग दिसून आला.विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती, चिकित्सक विचार आणि समस्या सोडविण्याची क्षमता विकसित करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.प्रदर्शनाच्या तयारीदरम्यान शिक्षकांनी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले.

पालक व उपस्थित पाहुण्यांनी विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाचे कौतुक केले. या विज्ञान प्रदर्शनातून शाळेची अनुभवाधारित व सर्वांगीण शिक्षणाप्रती असलेली बांधिलकी अधोरेखित झाली.

अशा उपक्रमांमुळे प्रियदर्शनी शाळा, मोशी येथे भविष्यातील वैज्ञानिक व नवोन्मेषक घडविण्यास प्रेरणा मिळते.

# सकाळी पत्र अन् दुपारी बैठक; "अजित सृष्टी" उभारणीला गती!

## भाजपाचे नेते आमदार महेश लांडगे यांची संवेदनशीलता | दिवंगत अजितदादा पवार यांना कृतीतून विधायक आदरांजली

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या महाराष्ट्राच्या विकासातील योगदानाला सन्मान देण्यासाठी आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पिंपरी-चिंचवड नवीन प्रशासकीय इमारतीच्या आवारात भव्य स्मारक उभारण्याच्या प्रक्रियेला गती मिळाली आहे. यासाठी भाजपाचे नेते आणि आमदार महेश लांडगे यांनी सकाळी पत्र पाठवून प्रशासनाला सविस्तर निवेदन दिले आणि दुपारी महापालिकेच्या अधिकाऱ्यांसह बैठक घेऊन पुढील नियोजन ठरवले.**

> पिंपरी-चिंचवड महापालिका नवीन प्रशासकीय भवनाच्या आवारात "सिटी सेंटर" उभारण्याची संकल्पना दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीच सूचवली होती. त्याच ठिकाणी अजितदादांचा पूर्णाकृती पुतळा आणि 'अजितसृष्टी' विकसित होईल. सर्वसामान्य नागरिकांसाठी पार्क आणि फाउंटन, लाईट्स, ऑब्झरव्हेशन टॉवर उभारण्याचे नियोजन आहे. यासह देश-विदेशातून शहरात येणारे पर्यटकांना शहराची माहिती, विकास प्रकल्प, शहराच्या विकासाची वाटचाल अधोरेखित होईल, अशी संकल्पना आहे.
>
> \- सुनील पाटील, वास्तुविशारद.

> "दिवंगत अजितदादा पवार यांनी महाराष्ट्राच्या विकासासाठी दिलेले योगदान शब्दात मांडता येणार नाही. 'अजित सृष्टी'च्या माध्यमातून त्यांच्या कार्याचा, विचारांचा आणि विकासदृष्टीचा वारसा जपला जाईल. हे स्मारक केवळ पुतळा नसून, भावी पिढ्यांना लोकसेवेची प्रेरणा देणारे विकासाचे प्रतीक ठरेल. पिंपरी-चिंचवडच्या इतिहासात हे एक आदर्श आणि दिशादर्शक केंद्र म्हणून उभे राहील."
>
> महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.



पिंपरी-चिंचवड महापालिका नवीन प्रशासकीय भवनाच्या आवारात "अजित सृष्टी" साकारण्यासाठी बैठक घेण्यात आली. यावेळी पिंपरी-चिंचवड महापालिकेचे मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, आर्किटेक्ट सुनील पाटील उपस्थित होते.

आमदार लांडगे म्हणाले की, दिवंगत अजितदादा पवार यांनी उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री म्हणून महाराष्ट्राच्या सर्वांगिण विकासाला गती दिली. पायाभूत सुविधा, नागरी सेवा, प्रशासकीय निर्णयक्षमता आणि विकासाभिमुख धोरणांमुळे राज्याला वेगळी ओळख मिळाली. त्यांच्या कार्याची जपणूक होणे ही महाराष्ट्राची गरज आहे.

चिंचवड येथील डी-मार्टसमोरील 33.86 एकर जागेत उभारण्यात येत असलेल्या नवीन प्रशासकीय संकुलात सुमारे 8.65 एकर क्षेत्रावर मुख्य इमारतीचे काम सुरू आहे. भविष्यात महापालिकेचे संपूर्ण प्रशासकीय कामकाज याच ठिकाणाहून चालणार आहे. या पार्श्वभूमीवर, इमारतीच्या आवारात अजितदादांचा पूर्णाकृती ब्राँझ पुतळा असलेले स्मारक उभारण्यात येणार आहे.

स्मारकासह नवीन सभागृहाचे नाव "अजितदादा पवार सभागृह" ठेवण्याची संकल्पना असून, शहराच्या स्थापनेपासून आजपर्यंतचा विकास प्रवास आणि भविष्यातील नियोजन अधोरेखित करणारी "अजित सृष्टी" उभारण्यात येणार आहे. "हे स्मारक भावी पिढ्यांना लोकसेवेची प्रेरणा देईल आणि हिच अजितदादांना खरी श्रद्धांजली ठरेल." तसेच, जुन्या महापालिका सभागृहात अजितदादांचे तैलचित्र तातडीने बसवले जावे आणि नवीन इमारतीच्या आवारात स्मारक उभारण्याचे निर्णय लवकरात लवकर घेण्यात यावे, अशा सूचना यावेळी आमदार लांडगे यांनी दिल्या.

# युनिफाईट स्पर्धेत पिंपरी-चिंचवडचा डंका



**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**श्रीगोंदा (अहिल्यानगर) येथे २३ जानेवारी रोजी पार पडलेल्या विभागीय युनिफाईट स्पर्धेमध्ये पिंपरी-चिंचवडमधील खेळाडूंनी घवघवीत यश संपादन केले आहे.**

### यशस्वी शाळा आणि खेळाडू

या स्पर्धेत न्यू इंग्लिश मीडियम स्कूल (थेरगाव), एम.एम. माध्यमिक विद्यालय (काळेवाडी), सेंट पीटर्स स्कूल, बालाजी स्कूल, पार्वती इंग्लिश मीडियम स्कूल आणि सिम्बॉयसिस कॉलेजमधील खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता.

या स्पर्धेत शहरातील विविध शाळांमधील एकूण २७ खेळाडू सहभागी झाले होते, त्यापैकी १३ खेळाडूंनी आपली मोहोर उमटवत पनवेल येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत.

**वाढती लोकप्रियता आणि उज्वल भविष्य**

गेल्या पाच वर्षांत पिंपरी-चिंचवड आणि संपूर्ण महाराष्ट्रात 'युनिफाईट' खेळाची लोकप्रियता झपाट्याने वाढली आहे. खेळाडू आणि क्रीडा शिक्षकांमध्ये या खेळाबद्दल असलेली ओढ पाहता, भविष्यात या क्षेत्रात नामवंत खेळाडू घडतील, असा विश्वास क्रीडा तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.

**मार्गदर्शकांकडून कौतुक**

पिंपरी चिंचवड युनिफाईट स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष श्री. यशवंत माने, सचिव संदीप माने, वरिष्ठ मार्गदर्शक विष्णुपंत पाटील, सुरेश कोळी, आणि प्रफुल प्रधान यांनी विजेत्यांचे अभिनंदन केले. तसेच पंच म्हणून कामगिरी बजावलेल्या गिरिजा मस्के, गौतम प्रजापती आणि अथर्व कावरे यांचेही कौतुक करण्यात आले.

क्रीडा पर्यवेक्षक पिं. चिं. महानगरपालिका श्री दीपक कण्हेरे सर तसेच, महाराष्ट्र युनिफाईट वेल्फेअर संघटनेचे अध्यक्ष श्री. संतोष खंदारे सर सचिव श्री.मंदार पनवेलकर यांनी खेळाडूंच्या या यशाबद्दल त्यांचे विशेष अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

### निवड झालेले खेळाडू

उत्तम भाटी, ऋषिकेश हाके, चिन्मय मस्के, प्रणव माने, बालाजी जाधव, तेहरीन पटेल, जान्हवी शिंदे, तेजस्वी जाधव, वैष्णवी हिप्परकर, गणेश मोरे, रवीना कुमावत, धृविता चव्हाण, ऋषिकेश विश्वकर्मा.

पिंपरी चिंचवड युनिफाईड स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष श्री. यशवंत माने यांनी या यशाबद्दल आनंद व्यक्त करताना सांगितले की,

"युनिफाईट हा खेळ केवळ शारीरिक ताकदच नाही तर मानसिक चपळता वाढवणारा खेळ आहे. पिंपरी-चिंचवडमधील मुलांमध्ये उपजत कौशल्य असून, गेल्या ५ वर्षांत आम्ही या खेळाचा तळागाळापर्यंत प्रसार केला आहे. आज निवड झालेले १३ खेळाडू राज्य स्तरावर नक्कीच सुवर्णपदक पटकावतील आणि शहराचे नाव उज्वल करतील, याची मला खात्री आहे. आगामी काळात या खेळाडूंना जागतिक दर्जाचे प्रशिक्षण देण्याचा आमचा मानस आहे."

# काळा घोडा कला महोत्सवासाठी पिंपरी चिंचवड महापालिका शाळांतील विद्यार्थ्यांची तयारी पूर्ण

## चार प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांनी साकारलेल्या कला मॉडेल्सचे ३१ जानेवारीला प्रदर्शन

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**मुंबई येथे दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा होणाऱ्या देशातील प्रतिष्ठित काळा घोडा कला महोत्सवासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या चार प्राथमिक शाळांची निवड झाली आहे. या शाळांतील विद्यार्थ्यांची महोत्सवात सादर होणाऱ्या कला मॉडेल्ससाठी तयारी पूर्ण झाली आहे. हा कला महोत्सव ३१ जानेवारी ते ८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत दक्षिण मुंबईतील ऐतिहासिक काळा घोडा परिसरात आयोजित करण्यात आला आहे. महोत्सवामध्ये ३१ जानेवारी रोजी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या विद्यार्थ्यांनी साकारलेली कला मॉडेल्स प्रदर्शनासाठी ठेवली जाणार आहेत.**

पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उपायुक्त ममता शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्रशासनाधिकारी संगीता बांगर, कला नोडल अधिकारी श्रीकांत चौगुले, मुख्याध्यापक शिवाजी दौंडकर, सरस्वती भेगडे, वंदना इन्नानी, मृगनयना चव्हाण, कला शिक्षक अपर्णा मोरे, मुक्ता पाउसळकर, नेताजी घोलप, विकास आगवणे यांच्या अधिपत्याखाली विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला. महापालिकेच्या शाळांमधील ११ ते १२ वयोगटातील विद्यार्थ्यांनी आपल्या कला शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत कल्पकतेने आणि मेहनतीने ही मॉडेल्स तयार केली आहेत. या मॉडेल्ससाठी निवडलेले विषय हे केवळ कलात्मक नसून मानवी जीवन, विचारप्रक्रिया आणि आधुनिक शहरी संकल्पनांवर आधारित आहेत.

यामध्ये 'अंतर्गत वळण', 'मानवी विचारांचे रोलरकोस्टर', 'रूपांतरण : जीवनाचे रोलरकोस्टर' तसेच 'स्कायवॉक : मर्यादांच्या पलीकडचे शहर' या विषयांचा समावेश आहे. या संकल्पनांमधून विद्यार्थ्यांनी मानवी मनातील चढउतार, जीवनातील बदल आणि शहराच्या विकासाच्या कल्पना प्रभावीपणे मांडल्या आहेत.

### निवड झालेल्या शाळा

- साई जीवन प्राथमिक कन्या शाळा, जाधववाडी
- श्री बापदेव महाराज प्राथमिक शाळा, किवळे
- यशवंतराव चव्हाण प्राथमिक कन्या शाळा क्र. ६०/१, थेरगाव
- श्री वैष्णो माता प्राथमिक विद्यामंदिर, इंद्रायणी नगर, पुणे

"पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांची काळा घोडा कला महोत्सवासारख्या प्रतिष्ठित राष्ट्रीय स्तरावरील कला मंचासाठी निवड होणे अभिमानाची बाब आहे. शालेय स्तरावरच विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता व कल्पनाशक्ती विकसित व्हाव्यात, या उद्देशाने शाळांमध्ये कला शिक्षणाला विशेष महत्त्व दिले जात आहे. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी केवळ कलात्मक कौशल्येच नव्हे, तर विचार मांडण्याची क्षमता, आत्मविश्वास आणि संघभावना आत्मसात केली आहे. अशा संधी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी निश्चितच उपयुक्त ठरतात.

- **विक्रांत बगाडे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.**



"महापालिकेच्या शाळांतील विद्यार्थ्यांनी कला शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली तयार केलेली मॉडेल्स ही त्यांच्या सर्जनशील विचारांची, कष्टाची आणि समजुतीची साक्ष देतात. मानवी जीवन, विचारप्रक्रिया आणि आधुनिक शहर संकल्पनांवर आधारित विषयांवर विद्यार्थ्यांनी केलेली मांडणी अत्यंत प्रभावी आहे. या प्रकारच्या कला उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्य, संवेदनशीलता आणि आत्मविश्वास वाढतो.

- **ममता शिंदे, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.**




## दुचाकीच्या धडकेत नागरिकाचा मृत्यू

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

निगडी येथील स्पाईन रोडवर भरधाव दुचाकीच्या धडकेत ७० वर्षीय ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू झाला. मारुती धोंडिबा पवार असे मृताचे नाव आहे. गुरुवारी रात्री नऊच्या सुमारास ही घटना घडली. पायी चालत असताना आरोपीने वाहतुकीचे नियम मोडून जोरात धडक दिली. याप्रकरणी सचिन पवार यांनी फिर्याद दिली असून दुचाकी चालक संतोष दहिहांडे याला अटक करण्यात आली आहे.

## हप्ता दिला नाही तर टपरी जाळून टाकण्याची महिलेला धमकी

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**'पानटपरी चालवायची असेल तर प्रत्येक महिन्याला ५०० रुपये हप्ता द्यावा लागेल, नाही तर तुझी टपरी जाळून टाकीन आणि तुला मारून टाकीन', अशी धमकी महिलेला दिल्याची घटना भोसरीत घडली. याबाबत ५० वर्षीय महिलेने एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.**





पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, महिलेची भोसरीतील लांडेवाडी येथे पानटपरी आहे. आरोपी टपरीवर आला. त्याने सिगारेट आणि पाण्याची बाटली घेतली. त्याला घेतलेल्या सिगारेट आणि पाण्याच्या बाटलीचे महिलेने पैसे मागितले असता तो चिडला. "तुला जर पानटपरी चालवायची असेल तर प्रत्येक महिन्याला ५०० रुपये हप्ता द्यावा लागेल, नाहीतर तुझी टपरी जाळून टाकीन आणि तुला मारून टाकीन" अशी धमकी त्याने दिली. आरोपीने जबरदस्तीने ५०० रुपये खंडणी स्वरूपात घेतले. या प्रकरणाचा तपास एमआयडीसी भोसरी पोलीस करत आहेत.

त्यानुसार पोलिसांनी सचिन डॅनियल खलसे (४०, लांडेवाडी, भोसरी) या आरोपीला अटक केली आहे.